सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय

वित्त विभाग, नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

---

क्र.मरालो-२०२६/प्र.क्र. ८०/ लॉटरी-३ दिनांक : १७ ऑगस्ट, २०२६

## जाहीर दरपत्रक नोटीस

विषय :- बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थाकडून हमालीच्या कामासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यासाठी दरपत्रक मागविणेबाबत.

संदर्भ :- उद्योग उर्जा व कामगार विभाग,शा.नि.क्र.भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६.

आयुक्त, महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाच्या अधिनस्त उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी, नवी मुंबई या कार्यालयासाठी १ हमाल यांची सेवा नोंदणीकृत बाह्ययंत्रणा संस्थांकडून अकरा महिन्यांच्या कालावधीसाठी उपलब्ध करुन घेण्यासाठी स्थानिक कंत्राटदारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

दरपत्रक सादर करणेसाठी सविस्तर तपशिल, बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थाकरिता तसेच कराराच्या आवश्यक अटी, शर्ती इ. विषयक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ. | पक्षकार :- |
|---|---|
| | करारनाम्याचे पक्षकार हे कंत्राटदार (ज्यांना काम सोपविले आहे) आणि मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य लॉटरी, मुंबई हे राहतील. |

| ब | हमाल पदासाठी उमेदवाराच्या अटी व शर्ती |
|---|---|
| १. | नेमणूक करण्यात येणाऱ्या उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ४५ वर्षे असावे. |
| २. | उमेदवाराची शरीरयष्टी मजबूत व किमान ५० किलो वजन उचलण्याची क्षमता असावी. |
| ३. | उमेदवार निरोगी, निर्व्यसनी असावा व गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. |
| ४. | उमेदवाराची वैयक्तिक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा. शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी, आधार कार्ड कॉपी, अलिकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटोग्राफ व बँक खात्याचा तपशिल |

| क. | हमाल पदाची सेवा देणाऱ्या संस्थेसाठी अटी व शर्ती |
|---|---|
| १. | संबंधित संस्था ही खालील पैकी एका कायद्यांर्गत नोंदणीकृत असावी (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी)<br>मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | भागीदारी संस्था अधिनियम १९३२<br>सहकारी संस्था अधिनियम १९६१<br>कंपनी अधिनियम १९५६ |
| २. | आयकर अधिनियमाप्रमाणे दरमहा अदा होणाऱ्या देयकामधून नियमानुसार आयकर वजा करण्यात येईल. यासाठी पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी. |
| ३. | वस्तु व सेवाकर कायदा २०१७ नुसार नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र व क्रमांक जोडण्यात यावे. |
| ४. | हमाल यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार विमा योजना (EPF/ESIS) अंतर्गत वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. |
| ५. | मागील २ वर्षाच्या कालावधीत किमान २ शासकीय/निमशासकीय कार्यालयांना हमाल किंवा अन्य कर्मचारी कंत्राटीतत्वार पुरविल्याबाबत व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. |
| ६. | संस्थेची वार्षिक उलाढाल ही मागील दोन वर्षासाठी सरासरी दहा लाखपेक्षा कमी नसावी. तसेच सनदी लेखापालांकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील दोन वर्षाच्या ताळेबंदाच्या प्रती निविदा अर्जासोबत जोडण्यात याव्यात. |
| ७. | संस्थेचे नाव काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे, संस्थेविराधात पोलिस चौकशी/ तपास/ न्यायालयीन प्रकरणे चालू नसल्याचे हमीपत्र संस्थेच्या चालकांचे सहीनिशी जोडण्यांत यावे. |
| ८. | कंत्राटदार अधिनस्त उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी, नवी मुंबई या कार्यालयासाठी १ हमाल पुरवतील. |
| ९. | कंत्राटदारास हमाल कर्मचाऱ्यास किमान वेतन अधिनियम १९४८ कायद्यानुसार दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग ह्या प्रकारातील अकुशल कामगाराकरिता वेतन देणे बंधनकारक राहील. |
| १०. | उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या सुधारीत अधिसूचना दि.२४.०७.२०१९ नुसार कंत्राटी किमान वेतनाचे दर सुधारीत करण्यांत आलेले आहेत. तसेच विविध कामगार कायद्यान्वये वेळोवेळी निश्चित केलेल्या दरानुसार विशेष/महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इतर भत्ते व वजावटी उदा. भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार विमा योजना/व्यावसायिक कर /बोनस / कामगार कल्याण निधी या दायित्वांचा समावेश करून एकूण किमान वेतन व भत्ते परिगणित करण्यांत आलेले आहे. त्यानुसार कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन व अनुषंगिक भत्ते प्रदान करणे तसेच नियमातील तरतूदीनुसार त्याबाबतची दायित्वे संबंधित प्राधिकरणाकडे भरणे बंधनकारक राहील. |
| ११. | वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१, दि.१९.०८.२०१७ नुसार जीएसटी अधिनियमानुसार कराची आकारणी बंधनकारक आहे. |

| ड. | **पात्र निविदाकाराने / पुरवठादाराने करावयाच्या कार्यवाहीबाबत :** |
|---|---|
| १. | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र: भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्र.४ /अ.क्र.४.६ मधील तरतुदीनुसार निविदा /दरपत्रक मान्य झालेल्या कंत्राटदारास / पुरवठादारास निकाल कळविल्यानंतर १५ दिवसाच्या आंत सुरक्षा ठेव अनामत (Security Deposit) रकमेसह रुपये १००००/- चा मुख्यालयाच्या ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) लेखा अधिकारी, आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य लॉटरी, मुंबई यांचे नावे द्यावा लागेल. विहित मुदतीत सुरक्षा ठेव अनामत जमा न केल्यास विहित नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल. लेखा अधिकारी, आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य लॉटरी,मुंबई यांनी प्राप्त सुरक्षा ठेव रक्कम योग्य लेखाशीर्षाखाली जमा करावी. |
| २. | पात्र कंत्राटदाराने / पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापूर्वी रुपये ५००/- चे मुद्रांक पेपर वर करारनामा करुन देणे आवश्यक राहील. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ३. | करारनामा केल्यानंतर कंत्राटदाराने दिलेल्या विहित मुदतीत आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा न केल्यास विहित नियमानुसार विलंब आकार / दंड आकारला जाईल.सदर दंडाची वसुली प्रशासकीय सेवा आकार किंवा सुरक्षा ठेव अनामत रकमेतून करण्यांत येईल. |
| ४. | कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेली सुरक्षा ठेव अनामत रक्कम जप्त केली जाईल. |
| ५. | करारनाम्याच्या कालावधीत कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यास, करारनाम्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर अथवा करारनामा संपुष्टात आल्यानंतर सदर अनामत रक्कम मुक्त करण्यात येईल. |
| ६. | मा. आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य लॉटरी, मुंबई यांना करारनामा रद्द करण्याचा / संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल. |
| ७. | कोणत्याही मुद्यांवर निर्णयाचा अंतिम अधिकार मा.आयुक्त महाराष्ट्र राज्य लॉटरी यांचा राहील. |

| इ | **बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ ( हमाल ) पुरविणाऱ्या संस्थांसाठी अटी व शर्ती** |
|---|---|
| १. | कंत्राटी कर्मचारी उमेदवाराची कंत्राटी सेवा चालू ठेवण्याचे/संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य लॉटरी, मुख्यालय,मुंबई यांचे स्वाधीन राहतील. |
| २. | कंत्राटी कर्मचारी वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहिल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही. |
| ३. | कंत्राटी कर्मचारी रजेवर असल्यास पर्यायी हमाल पुरविणे बंधनकारक राहील. |
| ४. | कंत्राटी कर्मचाऱ्यास सचोटी/चारित्र्याबाबतचे पोलीस खात्याचे प्रमाणपत्र हजर झाल्यावर सादर करावे लागेल. |
| ५. | नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना गणवेश कंत्राटदारानेच पुरविणे अनिवार्य राहील. |
| ६. | हमाल कंत्राटदाराचे कर्मचारी कार्यालयात गणवेशातच तसेच त्यांच्या संस्थेच्या ओळखपत्रासहीत कार्यालयात उपस्थित राहतील याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराने घ्यावी. |
| ७. | कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा कार्यालयाच्या गरजेनुसार ठरविण्यात येतील. त्यानुसार कंत्राटदाराने सर्व कर्मचारी सबंधित कार्यालयात पूर्णवेळ सकाळी ०९.१५ ते संध्याकाळी ०६.३० या वेळेत हजर राहतील ही जबाबदारी कंत्राटदाराची राहील. |
| ८. | कायम स्वरुपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे/ शासनाकडे /न्यायालयाकडे दावा अथवा खटला करणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र सेवेत हजर होताना सादर करणे बंधनकारक. |
| ९. | कोणतीही निविदा/दरपत्रक /ई-निविदा स्विकारण्याचा किंवा एखादी/सर्वच निविदा/दरपत्रक/ई-निविदा कारण न देता नाकारण्याचा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयास राहील. |
| १०. | कंत्राटदारास देयक सादर करण्यास विलंब झाला तरी देखील मासिक पारिश्रमिक कंत्राटदाराने / पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित उमेदवाराच्या बँक खात्यावर रेखांकित धनादेशाद्वारे (Account Payee Cross Cheque)/NEFT/ECS/RTGS व्दारे जमा करणे आवश्यक राहील. |
| ११. | कंत्राटदाराने/पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यास दिलेल्या पारिश्रमिकाच्या/इतर भत्त्यांच्या प्रदानाबाबतची छायांकीत प्रत दर महा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला/पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही. |
| १२. | कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी उमेदवारास मासिक वेतनचिठ्ठी देणे आवश्यक राहील. |
| १३. | कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यास किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास अथवा दायित्वाची रक्कम ठरलेल्या दराप्रमाणे कपात करुन संबंधित प्राधिकरणाकडे जमा न केल्यास अथवा संबंधित उमेदवाराकडुन ज्यादा रक्कम घेतल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास व तसे |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | पुरावे आढळल्यास संबंधित कंत्राटदार / पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल. |
| १४. | व्यवसाय कर भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांची राहील. |

उपरोक्त नमूद अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या बाह्ययंत्रणेच्या संस्थाकडून मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय, मुंबई मुख्यालयाच्या अधिनस्त उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी, नवी मुंबई या कार्यालयासाठी ०१ हमाल ११ महिन्यांकरीता सेवा घेण्यासाठी दि.२४/०८/२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

Pramod bhagat

(प्रमोद ह. भगत)
उपसंचालक तथा अवर सचिव
महाराष्ट्र राज्य लॉटरी, वित्त विभाग

Scanned with OKEN Scanner

## निविदा/दरपत्रक प्रपत्र-१

| | | |
|---|---|---|
| १. | केत्राटदाराचे संस्थेचे/कंपनीचे नाव व पुर्ण पत्ता | |
| २. | संस्था/ कंपनी फर्म असल्यास | |
| | अ) नोंदणीचा तपशील<br>आ) कंत्राटदाराचा /संस्थेचा /कंपनीचा संपूर्ण पत्ता | |
| ३. | संपर्काचा तपशील | |
| | अ) दुरध्वनी क्रमांक<br>आ) फॅक्सचा क्रमांक<br>इ) भ्रमणध्वनी | |
| ४. | दुकान परवाना क्रमांक | |
| ५. | EPF रजिस्ट्रेशन क्रमांक | |
| ६. | ESIC रजिस्ट्रेशन क्रमांक | |
| ७. | वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक | |

१. निविदा/ दरपत्रक मंजूर करण्याची सर्व अधिकार खरेदी समितीकडे राखीच आहेत हे मला मान्य आहे.

२. या निविदेतील/ दरपत्रकातील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

निविदा/दरपत्रकाराची सही
रबर स्टँम्प सह

Scanned with OKEN Scanner

## निविदा/दरपत्रक प्रपत्र-२

| अ.क्र. | बाब | अकुशल कामगारांसाठी दर (प्रतिमाह) रुपये मध्ये |
|---|---|---|
| १. | मूळ वेतन (Basic pay) | |
| २. | विशेष भत्ता (Special allowance) | |
| ३. | कामगार कायद्यातील तरतुदीनुसार भरावयाच्या अनिवार्य रक्कम जसे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कर्मचारी राज्य विमा योजना निवृत्ती वेतन निधी, कर्मचारी कल्याण निधी व्यवसाय कर इत्यादी | |
| ४. | कंत्राटदार / पुरवठादाराचे प्रशासनिक सेवा खर्च ( firms administrative charges ) | |
| ५. | वस्तु व सेवा कर | |
| | एकूण | |

अक्षरी रक्कम रुपये ...........................

ठिकाण :-

दिनांक :-

स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner